I.O करीता



**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** शेवगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0075 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/01/2023 17:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 13/01/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 13/01/2023

**Time From (वेळेपासून):** 17:36 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/01/2023 **Time (वेळ):** 15:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 027

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/01/2023 17:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, .1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शेवगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमिर फिरोज इनामदार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1999

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नेवासारोड,शेवगाव ,शेवगाव ,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नेवासारोड,शेवगाव ,शेवगाव ,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोना 588 एस.सी. काकडे | | | 1. शेवगाव पोलीस स्टेशन,शेवगांव, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास**)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत **):**

शेवगांव पोलीस स्टेशन, जि.अ.नगर.
दि. 31/01/2023

फिर्याद

माझे नाव अमिर फिरोज इनामदार, वय-24 वर्षे, व्यवसाय - शिक्षण, रा.नेवासा रोड, षेवगांव, ता.शेवगांव, जि. अहमदनगर. मो.नं. 7350686739.

समक्ष पोलीस स्टेषन मध्ये हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील पत्त्यावर परिवारासह राहतो. दिनांक 12/01/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे माझा सावत्र भाऊ आदित्य अंधारे यांचे फोनवरून माझेकडे लोकसेवक लाचेची मागणी करत असलेबाबत तक्रार दिली होती. त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाषिक कडील श्रीमती साधना इंगळे, पोलीस निरीक्षक यांचेशी संपर्क केला असता, त्यांनी आम्ही सापळा पथकासह शेवगाव येथे येवुन तुम्हांस भेटतो बाबत कळविले. यानंतर त्यांचे सुचनेप्रमाणे मी दि. 13/01/2023 रोजी शेवगाव येथे स्पाईस तंदुर चायनिज हॉटेलचे पाठीमागील मोकळ्या जागेत थांबलो. तेथे श्रीमती इंगळे, पोलीस निरीक्षक व त्यांचे सापळा पथकातील सदस्य व पंच नं. 1) श्री.प्रषांत विजय लकारिया, कनिष्ठ लिपीक पंच नं. 2) श्री.नारायण खंडु लांडे, वरिश्ठ लिपीक, दोन्ही नेम. कर आकारणी विभाग, नाशिक महानगरपालीका, नाशिक अशांचा व माझा आपसात परिचय करुन दिला. त्यानंतर मी माझी तक्रार त्यांना सांगितली की, ''माझे वडील फिरोज उस्मानोदीन इनामदार यांचा दि.24/11/2022 रोजी शेवगाव-पाथर्डी रोडवर अॅक्सीडेंट झाला होता. अॅक्सीडेंट मध्ये माझे वडील गंभीर जखमी झाल्यामुळे त्यांना उपचाराकरीता पहिल्यांदा शेवगावला नेले, तेथुन अहमदनगर, त्यानंतर पुणे येथे उपचाराकरीता नेले. पुणे येथे संचेती हॉस्पीटल मध्ये त्यांना अॅडमिट करण्यात आले. संचेती हॉस्पीटल पुणे येथे एम.एल.सी.क्र.3136/22, दिनांक 25/11/2022 रोजी दाखल करून माझे वडीलांवर दवाउपचार सुरु झाला व त्यांनी पोलीसांना देखील एम.एल.सी. कळवली. माझ्या वडीलांची उजव्या पायाची नस दाबली गेल्यामुळे त्यांचा पाय कापावा लागला. त्यानंतर मी शेवगांव पोलीस स्टेशन येथे गेलो व माझ्या वडीलांचा अॅक्सीडेंट करणाऱ्या वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल करा असे सांगितले,''तक्रार देण्यासाठी माझ्या वडीलांना घेऊन या'' असे तेथील पोलीसांनी सांगितले परंतु वडीलांचा पाय कापला असल्यामुळे ते तक्रार देण्यास जाऊ शकले नाहीत.

दरम्यान दि.06/12/2022 रोजी माझ्या वडीलांचा मृत्यू झाला त्यामुळे मी पोलीस स्टेशनला जाऊ शकलो नाही. काही दिवसांनी मी परत शेवगांव पोलीस स्टेशन येथे गेलो व माझ्या वडीलांचा अॅक्सीडेंट करणाऱ्या वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल करा असे सांगितले त्यावेळी तेथील पोलीस काकडे यांनी मला सांगितले की, एम.एल. सी.चे कागदपत्र अजुन त्यांना मिळालेले नाही. दि.22/12/2022 रोजी मी पुन्हा पोलीस स्टेशनला गेलो त्यावेळी मला पोलीस काकडे यांनी अहमदनर व पुणे येथील दवाखानाच्या नावे पत्र दिले व इंन्ज्युरी सर्टिफिकेट आणण्यास सांगितले. दिनांक 12/1/2023 रोजी मी व माझा सावत्र भाऊ आदित्य असे आम्ही दोघे इंन्ज्युरी सर्टिफिकेट देण्यासाठी पोलीस स्टेशनला गेलो त्यावेळी पोलीस काकडे यांनी ''माझ्या वडीलांचा अॅक्सीडेंट करणाऱ्या वाहनाचा शोध घेऊन, गुन्हा दाखल करण्याचे मोबदल्यात माझ्याकडे वीसहजार रूपयांची लाच मागितली.'' माझ्या वडीलांचा अॅक्सीडेंट मुळे पाय कापावा लागला व त्यांचा मृत्यु देखील झाला तरी गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस माझ्याकडे पैसे मागत आहे. तरी मला पोलीसांना लाच देण्याची इच्छा नसल्याचे मी माझ्या सावत्र भाऊ आदित्यला सांगुन नाशिक अॅन्टी करप्शन ब्युरो येथे फोन केला.

तरी माझ्या वडीलांचा अॅक्सीडेंट करणाऱ्या वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे मोबदल्यात माझ्याकडे वीसहजार रूपये लाचेची मागणी करणाऱ्या पोलीस काकडे यांचेविरूध्द माझी तक्रार असुन त्यांचेवर आपले मार्फत योग्य ती कार्यवाही होणेस विनंती आहे'' वगैरे मजकुराची तक्रार सांगितली. मी माझी तक्रार सविस्तर स्वःहस्ताक्षरात

समक्ष मराठीत लिहुन दिली.
मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे श्रीमती इंगळे, पोलीस निरीक्षक यांनी शेवगाव पोलीस स्टेषनचे पोलीस कर्मचारी काकडे हे माझे कडे खरोखर पैसे मागतात अगर कसे ? याची पडताळणी करणे साठी दिनांक 12/01/2023 रोजी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ते माझे कडे देवुन, मला व पंच नं.1 श्री.लकारिया अशांना शेवगाव पोलीस स्टेशन येथे माझे मोटार सायकलने पडताळणी कामी पाठविले असता आम्हाला शेवगाव पोलीस स्टेशनकडील पोलीस कर्मचारी सानप हे भेटले, त्यांनी माझे वडीलांच्या मृत्यूशी निगडीत सर्व हकिगत विचारुन सविस्तर जबाब घेतला. त्याव्यतिरिक्त इतर काहीएक बोलणे किंवा लाचेची मागणी केली नाही. तसेच पोलीस काकडे यांचे बददल विचारपुस केली असता पोलीस सानप यांनी सांगितले की, पोलीस काकडे हे संध्याकाळी पोलीस स्टेषनला येणार आहे बाबत कळविले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन स्पाईस तंदुर चायनिज हॉटेल चे पाठीमागील मोकळ्या जागेत परत आलो. त्यानंतर पंच नं.1 श्री.लकारिया यांनी व मी सांगितले हकिगत व रेकॉर्ड करण्यात आलेले संभाषण श्रीमती इंगळे व सापळा पथकाने तसेच पंचानी ऐकले. त्यानंतर पोलीस काकडे हे संध्याकाळी पोलीस स्टेशनला येणार असल्याने पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ते माझेकडे देवुन, मला व पंच नं.1 श्री.लकारिया अशांना शेवगाव पोलीस स्टेशन येथे माझे मोटार सायकलने पडताळणी कामी रवाना केले असता पोलीस कर्मचारी श्री.काकडे यांनी पंचा समक्ष माझेकडे माझ्या वडीलांचा अॅक्सीडेंट करणा-या वाहन चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यासाठी 20,000/- रू. लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.14/01/2023 रोजी शेवगांव पोलीस ठाणे येथे घेवुन येण्यास सांगितले. त्यांनी केलेली पैशांची मागणी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झाली असुन ती श्रीमती इंगळे, पोलीस निरीक्षक यांनी व पंचानी ऐकुन खात्री केली. तसा पंचनामा करण्यात आलेला आहे.
दिनांक 14/01/2023 रोजी पोलीस कर्मचारी काकडे यांना लाच म्हणुन देणेसाठी 20,000/-रुपये हजर केले. त्यात 500/- रूपये दराच्या 40 चलनी नोटा असे एकुण 20,000/- रुपये हजर केले, त्यांचे नंबर व वर्णन पंचनाम्यात नमुद करण्यात आले आहे. सदर नोंटा अँथ्रासिन पावडर लावुन त्या माझे पॅन्टचे उजवे खिषात ठेवण्यात आल्या. तसेच पोलीस कर्मचारी काकडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास शर्टच्या दोन्ही फोल्ड केलेल्या बाहया खाली करावे म्हणजे लाच स्विकारल्याबाबतचा इशारा समजण्यात येईल बाबत सुचना दिल्या. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.
त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझे कडे देवुन, मला, माझा सावत्र भाउ अभिषेक व पंच नं.1 श्री.लकारिया असे शेवगाव पोलीस स्टेषन येथे पोलीस कर्मचारी काकडे यांचे भेटी करिता साईपुजा लॉजिंग व हॉटेल, शेवगाव येथुन आमचेकडील चारचाकी वाहनाने निघुन आमचे पाठोपाठ श्रीमती इंगळे, पंच नं.2 श्री.लांडे तसेच सापळा पथक असे त्यांचेकडीजल खाजगी वाहनाने येवुन शेवगाव पोलीस स्टेशनच्या परिसरात आपले अस्तीत्व लक्षात येणार अशा रितीने थांबून सापळा आयोजित केला.परंतु पोलीस कर्मचारी काकडे हे पोलीस स्टेशनला दिसले नाही म्हणुन तेथे विचारपुस करुन मी माझे मोबाईलवरुन पोलीस काकडे यांना फोन केला असता त्यांनी त्यांना नाईट डयुटी असल्याने ते पोलीस स्टेशनला येणार नसल्याचे कळविले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन परत आलो. त्यानंतर श्रीमती इंगळे यांनी मला व पंच नं.1 श्री.लकारिया यांना घडलेली हकिगत विचारली. तसेच माझे ताब्यातील लाचेची रक्कम त्यांचे ताब्यात घेतली. तसा पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर दि.16/01/2023 श्रीमती इंगळे, पोलीस निरीक्षक, दोन्ही पंच व सापळा पथक असे पुन्हा शेवगांव येथील न्यु आर्टस व कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेजचे मैदान जवळ आले व तेथुन सापळा कारवाई बाबत सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझे कडे देवुन, मला, माझा सावत्र भाउ अभिषेक व पंच नं.1 श्री.लकारिया असे शेवगाव पोलीस स्टेशन येथे पोलीस कर्मचारी काकडे यांचे भेटी करिता आमचेकडील चारचाकी वाहनाने रवाना केले. आमचे पाठोपाठ श्रीमती इंगळे, पंच नं.2 श्री.लांडे तसेच सापळा पथक असे त्यांचेकडीजल खाजगी वाहनाने येवुन शेवगाव पोलीस स्टेशनच्या परिसरात आपले अस्तीत्व लक्षात येणार अषा रितीने थांबून सापळा आयोजित केला. शेवगांव पोलीस स्टेशन येथे गेल्यानंतर तेथे पोलीस काकडे हे न दिसल्याने त्यांचे बद्दल शेवगाव पोलीस स्टेशन मधील कर्मचारी यांना विचारपुस केली असता त्यांनी माहित नसलेबाबत सांगितले व तेथील एका पोलीसाने काकडे यांचा दुसरा मोबाईल क्रमांक दिला असता मी त्यांचे मोबाईलवर फोन लावला असता सदरचा मोबाईल हा संपर्क क्षेत्राबाहेर असल्याचे समजले. पोलीस काकडे यांचेषी संपर्क न झाल्याने आम्ही विचारपुस केली असता पोलीस काकडे हे गैरहजर असल्याचे समजल्याने आम्ही परत आलो. श्रीमती इंगळे, पोलीस निरीक्षक यांनी व पंचानी रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली. तसेच व्हाईस रेकॉर्डर मधील आमचे संभाषण रेकॉर्ड झालेले मेमरीकार्ड काढुन ताब्यात घेतले. तसा पंचनामा करण्यात आलेला आहे.
तरी मी दि. 13/01/2023 रोजी दिलेल्या तक्रारी वरून झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान शेवगांव पोलीस

स्टेशन येथील पो.ना/588, एस.सी.काकडे यांनी माझ्या वडीलांचा अँक्सीडेंट करणा-या वाहन चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यासाठी माझ्याकडे 20,000/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दिनांक 14/01/2023 रोजी स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन त्यांचे विरुध्द माझी लेखी फिर्याद आहे.

माझी वरील मराठी मध्ये टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचून पाहीली असता ती मी सांगीतले प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली
दि.31/01/2023

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

vilas sahadu pulari(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
शेवगांव पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** vilas sahadu pulari
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**